


॥ श्री संत ज्ञानेश्वर महाराज ॥

प्रकरण : पहिले

# आनंद यादव : वाङ्मयीन जडणघडण

प्रकरण : पहिले

# आनंद यादव : वाङ्मयीन जडणघडण


१.१ प्रस्तावना

१.२ आनंद यादव यांचा परिचय

१.२.१ जन्म व बालपण

१.२.२ शिक्षण

१.२.३ संस्कार

१.२.४ वाचन व लेखन

१.२.५ नोकरी

१.३ आनंद यादव यांच्या वाङ्मयाचा आढावा

१.३.१ कविता

१.३.२ कथा

१.३.३ कादंबरी

१.३.४ ललितगद्य

१.३.५ वगनाट्य

१.३.६ समीक्षा

१.३.७ चरित्रात्मक कादंबरी

१.४ आनंद यादव यांच्या साहित्यास मिळालेले पुरस्कार

१.५ समारोप

संदर्भ

प्रकरण : पहिले

# आनंद यादव : वाङ्मयीन जडणघडण

## १.१ प्रस्तावना :

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्यामध्ये जे नवनवीन वाङ्मयीन प्रवाह उदयास आले. त्यातील एक महत्त्वाचा प्रवाह म्हणजे 'ग्रामीण साहित्य' होय. ग्रामीण साहित्याला समृद्ध करण्यासाठी अनेक ग्रामीण साहित्यिकांनी हातभार लावलेला आहे. अशा या ग्रामीण साहित्यातील एक महत्त्वाचे नाव म्हणजे आनंद यादव हे होय. प्रस्तुत प्रकरणामध्ये आनंद यादवांचा जन्म, बालपण, शिक्षण, कौटुंबिक जीवन, त्यांच्यावरील विविध साहित्यिकांचा प्रभाव, त्यांची एकूण वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची जडणघडण आणि त्यांचे लेखन यांचा स्थूल आढावा घ्यावयाचा आहे.

आनंद यादव यांनी कविता, कथा, कादंबरी, आत्मकथन, ललितगद्य व वगनाट्य असे विविध वाङ्मयप्रकार हाताळून ग्रामीण साहित्याला समृद्ध केले आहे. किंबहुना त्यांनी त्यांच्या संवेदनशील लिखाणामुळे मराठी साहित्यात स्वतःचे वेगळे असे स्थान निर्माण केलेले आहे. यादवांच्या साहित्यनिर्मितीच्या प्रेरणासुद्धा त्यांच्या संघर्षमय जीवनातून निर्माण झालेल्या दिसतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व नवलेखकांना यादवांचे जीवन निश्चितच प्रेरणादायक ठरलेले आहे.

यादवांनी ग्रामीण भागातील तरुण लेखकांना मार्गदर्शन करण्यासाठी आधुनिक ग्रामीण साहित्याची चळवळ उभारली. समीक्षक, सर्जनशील लेखक आणि साहित्य चळवळीचे प्रवर्तक ही त्यांची वाङ्मयीन कामगिरी महत्त्वपूर्ण आहे. अशा या ग्रामीण लेखकांचे जीवनचरित्र व त्यांच्या ग्रामीण साहित्यनिर्मितीचा स्थूल आढावा घेणे उचित ठरावे.

## १.२ आनंद यादवांचा परिचय :

### १.२.१ जन्म व बालपण :

आनंद यादव यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कागल या तालुक्याच्या गावी ३० नोव्हेंबर १९३५ रोजी झाला. आनंद यादव यांच्या वडिलांची स्वतःची शेती नसल्यामुळे ते दुसऱ्याची शेती भाडेपट्टीने करण्यास घेत व सहकुटुंब त्या शेतात राबत असत. आनंद यादव

यांचे बालपण एका गरीब शेतमजुराच्या कुटुंबात गेले. यादवांचे पूर्वज कर्नाटकातून महाराष्ट्रात आल्यावर कागल येथे स्थायिक झाले. त्यांच्या पूर्वजांचा जकात गोळा करण्याचा व्यवसाय असल्यामुळे त्यांना जकाते हे पडनाव पडले होते. पण पुढे रत्नागिरी येथे कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना पु. ल. देशपांडे यांच्याशी आनंदाचा परिचय घडून आला व त्यांच्या सांगण्यावरून आनंदाने 'जकाते' हे पडनाव बदलून 'यादव' हे मूळचे आडनाव धारण केले. तेव्हापासून 'आनंद रत्नाप्पा जकाते' चा 'आनंद रतन यादव' झाला. त्यांच्या आईचे नाव ताराबाई हे होते. बारा भावंडापैकी आनंद यादव हे मुलात थोरले होते.

आनंद यादव यांचे बालपण दारिद्र्यात व कष्टात गेले. कुटुंबातील थोरला मुलगा म्हणून वडिलांनी त्यास शाळेत घातले. पुढे पाचवी इयत्तेत असताना आनंदास वडिलांच्या आग्रहाखातर शाळा सोडून शेतातील कामे करावी लागली. पण शिक्षणाची जिद्द असल्यामुळे त्यांनी हायस्कूलपर्यंतचे शिक्षण मोठ्या कष्टाने पूर्ण केले. आनंद यादवांची शिक्षणाची ओढ, हुषारी आणि जिद्द पाहून काही शिक्षकांनी त्यांना मार्गदर्शन केले.

**१.२.२ शिक्षण :**

आनंद यादवांनी हायस्कूलपर्यंतचे शिक्षण कागल येथे पूर्ण केल्यानंतर पुढे १९५५ साली गावातील काही व्यक्तींच्या मदतीने शिक्षण घेण्यासाठी रत्नागिरीस गेले. त्यानंतर ते महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी ते रत्नागिरीहून कोल्हापुरात आले आणि 'प्रिन्स शिवाजी बोर्डिंगमध्ये' राहून त्यांनी गोखले कॉलेजमध्ये पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. यादवांना पुणे आकाशवाणीवर काम करण्याची संधी मिळाल्यामुळे पुणे विद्यापीठात मराठी-संस्कृत या विषयातून एम.ए.ची पदवी त्यांनी घेतली. तसेच डॉ. रा. शं. वाळिंबे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी मराठी लघुनिबंधावर संशोधन करून १९७४ साली पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी मिळविली आणि १९९२ पासून ते पुणे विद्यापीठामध्ये 'मराठी विभाग प्रमुख' म्हणून नोकरी करू लागले.

**१.२.३ संस्कार :**

यादवांच्या वडिलांचा शिक्षणास विरोध होता. पण आईकडून त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळत होते. प्राथमिक शाळेत शिकत असताना त्यांची शिक्षणाची ओढ, जिद्द व

हुषारी पाहून न. वा. सौंदलगेकर गुरुजी, तु. बा. नाईक, ज्ञा. बा. सणगर इत्यादी शिक्षकांचे त्यांना मार्गदर्शन मिळाले. तसेच रत्नागिरी येथे शिक्षण घेत असताना कवी य. द. भावे, प्रा. रा. वा. चिटणीस व पु. ल. देशपांडे यांचा सहवास लाभला.

**१.२.४ वाचन व लेखनः**

रत्नागिरी येथे वास्तव्यास असताना यादवांना 'सत्यकथा' हे नववाङ्मयातील मासिक वाचायला मिळाले या मासिकातून शंकर पाटील व व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथा प्रसिद्ध होत होत्या. त्यांनी या कथांचे सूक्ष्म वाचन केले. बा. सी. मर्ढेकर, गंगाधर गाडगीळ यांचे नवसाहित्याचे विचार सत्यकथेतून त्यांनी आत्मसात करून घेतले. यासंदर्भात डॉ. रवींद्र ठाकूर म्हणतात, ''यादवांनी अनेक वाङ्मयप्रकार हाताळले. वेगवेगळी अनुभवविश्वे आकळण्याचा प्रयत्न केला परंतु आपण प्राधान्याने ग्रामीण लेखक आहोत याचे भान कधीही दृष्टिआड होऊ दिले नाही. शिक्षण आणि नोकरीनिमित्त ते आपल्या घरा-गावापासून दूर गेले तरी आपली जीवनजाणीव ज्या भूमीत पोसली गेली त्या मातीला ते कधी विसरले नाहीत''[१] यादवांनी ग्रामीण जीवनाशी संबंधी असे लेखन करून ग्रामीण व्यक्तीचे शोषित व त्यांचे उपेक्षित जीवन त्यांनी साहित्यातून मांडले.

**१.२.५ नोकरी :**

सुरुवातीस यादव हे पुणे आकाशवाणीवर नोकरी करीत असतानाच त्यांनी पुणे विद्यापीठात एम. ए. पूर्ण केले. त्यानंतर जून १९६१ मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या पंढरपूर येथील महाविद्यालयात 'प्राध्यापक' म्हणून त्यांनी नोकरी केली. तसेच जून १९६३ मध्ये पुण्याच्या श्री शाहू मंदिर महाविद्यालयात त्यांनी प्राध्यापकाची नोकरी स्वीकारली. पुढे पुणे विद्यापीठात प्रपाठक म्हणून ते रुजू झाले. १९९२ पासून ते पुणे विद्यापीठात 'प्राध्यापक' व 'मराठी विभाग प्रमुख' या पदावर काम करीत होते.

वयाच्या सव्वीसाव्या वर्षी डॉक्टर घाटुगडे यांच्या स्मिता या मुलीशी यादवांचा विवाह झाला. त्यांना स्वाती, कीर्ती या दोन मुली व आशुतोष हा एक मुलगा आहे.

नोव्हेंबर १९८७ मध्ये साक्री (जि. धुळे) येथे झालेल्या पहिल्या अखिल भारतीय 'दलित-आदिवासी- ग्रामीण संयुक्त' साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

## १.३ आनंद यादव यांच्या वाङ्मयाचा आढावा :

आनंद यादव यांनी कविता, कथा, कादंबरी, ललितगद्य, वगनाट्य, समीक्षा, चरित्रात्मक कादंबरी इत्यादी वैविध्यपूर्ण वाङ्मयप्रकार हाताळले. त्याचबरोबर या सर्व वाङ्मयप्रकारावर समीक्षात्मक असे लिखाण त्यांनी केले. यादवांनी ग्रामीण साहित्याला प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांच्या या ग्रामीण साहित्यनिर्मितीचा स्थूल आढावा येथे घेणे उचित ठरावे.

### १.३.१ कविता :

आनंद यादव यांनी आपल्या लेखनाची सुरुवात काव्य लेखनाने केली. शालेय जीवनात यादवांचा जानपद कवितेशी परिचय झाला. त्या कवितांचे वाचन केल्यामुळे आपण ही अशा प्रकारच्या कविता लिहू शकतो असे त्यांना वाटू लागले आणि विशेष म्हणजे मराठी चौथ्या इयत्तेत असताना त्यांनी कविता लिहिली. शरचंद्र मुक्तिबोध, विं. दा. करंदीकर, नारायण सुर्वे यांच्या कविता प्रसिद्ध होत होत्या. त्याच काळात ग्रामीण बोलीच्या माध्यमातून ग्रामीण जीवनानुभूती व्यक्त करणाऱ्या कविता यादव लिहित होते. स्वतः यादव आपल्या काव्यनिर्मितीसंबंधीच्या प्रेरणाबाबत सांगतात, ‘‘या संग्रहातील मी त्यावेळी अनुभवत असलेले, पाहिलेले, स्वतः भोगलेले अनेक अनुभव आलेले आहेत. किंबहुना त्या जोरावरच मी ग्रामीण कविता लिहिली म्हणजे ही कविता लिहिताना इतरांपेक्षा वेगळे प्रत्यक्ष अनुभवलेले अस्सल स्वरूपातील ग्रामीण जीवन आपणाला रेखाटता येईल ही माझी प्रेरणा होती.’’[२] आपणच खरे ग्रामीण जीवन कवितेतून व्यक्त करू शकतो. तसेच आपली कविता इतरापेक्षा वेगळ्या प्रकारची असावी असे त्यांना वाटत. याबाबत रवींद्र ठाकूर यांचे मत विचारात घेण्याजोगे आहे, ‘‘यादवांनी आपल्या लेखनास सुरुवात केली तीच मुळात एक प्रकारच्या असमाधानातून, काही अपवाद वगळता जानपद कविता आणि १९५० ते १९६० या काळात प्रसिद्ध झालेल्या ग्रामीण साहित्यातून खरे ग्रामीण जीवन चित्रित झालेले नाही अशी त्यांची प्रामाणिक धारणा होती. म्हणूनच ग्रामीण जीवनाचे वास्तवपूर्ण चित्र रेखाटण्याच्या उद्देशाने त्यांनी लेखनास प्रारंभ केला.’’[३] त्यांच्या कवितेतून खरेखुरे ग्रामीण जीवन चित्रित होत होते.

यादवांचे आतापर्यंत तीन कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. १) हिरवे जग २) मळ्याची माती ३) मायलेकरं

'हिरवे जग' या संग्रहातील कविता प्रासंगिक आणि नाट्यगितात्म आहेत. तसेच शेती, पिके, निसर्ग, शेतकऱ्याच्या श्रद्धा, ऊन, पाऊस इत्यादीचा आविष्कार या काव्यसंग्रहामध्ये केलेला आढळतो.

'मळ्याची माती' या संग्रहातील कविता आत्मनिष्ठ आहेत. तसेच दरिद्री व कष्टकरी शेतकऱ्याचे भावविश्व या कवितेतून व्यक्त झाले आहे. खेड्यापासून व आपल्या मातीपासून आपण दूर शहरात चाललो आहे अशी खंत कवी व्यक्त करतो. त्यातूनच कवीमनात निर्माण झालेली श्रद्धा दिसते.

'मायलेकरं' हा यादवांचा दीर्घ कवितासंग्रह आहे. यामध्ये मुलगा व आई यांच्यात झालेल्या संवादाचे वर्णन केले आहे. यातील भाषा खास मराठमोळी व ग्रामीण वळणाची आहे. आधुनिक मराठी कवितेत यादवांच्या कवितेचे स्थान महत्त्वाचे आहे. यानंतर यादवांनी 'कथा' हा वाङ्मयप्रकार हाताळला.

**१.३.२ कथा :**

१९४५ नंतर मराठी कथेत परिवर्तन झाले. माडगूळकर, शंकर पाटील, उद्धव शेळके, रा. रं. बोराडे इत्यादी ग्रामीण लेखकांनी अनेक कथा लिहिल्या. त्यांच्या कथेचे सूक्ष्म वाचन करून यादवांनी १९६३ पासून कथालेखनास सुरुवात केली. तो कालखंड नवकथेचा आणि ग्रामीण साहित्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण होता. ग्रामीण जीवनातून आलेले अनुभव व आपल्या भावना कवितेतून व्यक्त करताना यादवांना मर्यादा जाणवू लागली. म्हणून ते कथा लेखनाकडे वळले. माटे, मुक्तिबोध, माडगूळकर, शंकर पाटील इत्यादी ग्रामीण लेखकांप्रमाणे आपणही कथालेखन करावे, असे त्यांना वाटू लागले आणि यातूनच त्यांना कथालेखनास प्रेरणा मिळाली. त्यांचे एकूण सात कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्यामध्ये १) खळाळ, २) घरजावई, ३) माळावरची मैना, ४) माती खालची माती, ५) आदिताल, ६) उखडलेली झाडे, ७) डवरणी यांचा समावेश होतो.

'खळाळ' हा यादवांचा पहिला कथासंग्रह असून यामधून ग्रामीण जीवनाचे सर्वांगीण दर्शन घडते. ग्रामीण भागातील सामान्य माणूस, त्यांचे दुःख, दैन्य, दारिद्र्य आणि भावविश्व हा त्यांच्या कथेचा विषय आहे. या संग्रहातील व्यक्ती आपले दुःख इतरांना न सांगता स्वतः सहन करताना दिसतात.

'घरजावई' व 'माळावरची मैना' या दोन्ही कथासंग्रहात विनोदी कथा पहावयास मिळतात. यातील विनोद प्रसंगनिष्ठ व जीवनात घडणाऱ्या विसंगतीतून निर्माण झालेले आहेत.

'मातीखालची माती' हा कथासंग्रह व्यक्तिचित्रणात्मक आहे. यामध्ये प्रत्येक व्यक्तीने जीवन जगण्यासाठी केलेले प्रयत्न, त्यांची जिद्द, भावना व त्यांच्याजवळ असलेली माणूसकी इत्यादीचे चित्रण यादवांनी उत्कटतेने केले आहे.

'आदिताल' या कथासंग्रहातून मानवी मनातील आदिम कामभावनेचा वेध यादवांनी घेतला असून यातील कथा चिंतनशील रूपातील आहेत.

'उखडलेली झाडे' या कथासंग्रहातून बदलत्या खेड्याचे वर्णन यादवांनी केलेले आहे. यामध्ये गरीब शेतकरी, कामकरी आणि तळागाळातील माणूस यांच्या जीवनातील वास्तव परिस्थितीचे चित्रण आलेले आहे. त्यांच्या या कथासंग्रहाविषयी द. दि. पुंडे म्हणतात, ''त्यांचा हा कथासंग्रह म्हणजे वर्तमान मराठी खेड्यावरचे आणि त्या संदर्भात एकूणच मराठी समाजावरचे प्रातिनिधिक भाष्य वाटावा अशा योग्यतेचा आहे.''[४]

'डवरणी' या कथासंग्रहामध्ये खेड्यातील भीषण दारिद्र्याचे चित्रण करून मूलभूत मानवी भावनांचा शोध यादवांनी घेतलेला आहे.

थोडक्यात यादवांची कथा ग्रामीण साहित्यात आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण करते असे म्हणता येईल. 'कविता', 'कथा' या वाङ्मयप्रकाराचे लेखन केल्यानंतर यादव 'कादंबरी' या वाङ्मयप्रकाराकडे वळले.

**१.३.३ कादंबरी :**

आनंद यादवांनी कविता, कथा, कादंबरी या क्रमाने वाङ्मयप्रकार हाताळले. व्यापक अशा जीवनातून आलेले अनुभव व्यक्त करण्यासाठी 'कथा' हा साहित्यप्रकार त्यांना अपुरा

वाटू लागला म्हणून ते 'कादंबरी' या साहित्यप्रकाराकडे वळले. ग्रामीण साहित्यात यादवांच्या कादंबरीला विशेष प्रतिष्ठा मिळाली. यादवांनी आतापर्यंत एकूण नऊ कादंबऱ्यांचे लेखन केले आहे. त्यामध्ये १) गोतावळा, २) नटरंग, ३) एकलकोंडा, ४) माऊली, ५) झोंबी, ६) नांगरणी, ७) घरभिंती, ८) काचवेल, ९) कलेचे कातडे यांचा समावेश होतो.

'गोतावळा' या कादंबरीमध्ये एका खेडे गावात सालगडी म्हणून शेतकाम करणाऱ्या अनाथ नारबाची ही आत्मकथा असून प्रथमच प्राण्यांच्या व्यक्तिमत्त्वांचा प्रत्यय घडविला आहे. मुक्या प्राण्यांना बोलते करायला लावणारी मराठीतील ही पहिलीच कादंबरी असावी.

'नटरंग' या कादंबरीत तमाशाच्या ध्यासापायी 'गुणा' या ग्रामीण कलावंताच्या जीवनाची झालेली शोकांतिका यादवांनी चित्रित केली आहे.

'एकलकोंडा' ही शिक्षणासाठी धडपडणाऱ्या आणि शिक्षण घेऊन बेकार झालेल्या ग्रामीण तरुणाची करुण कहाणी चित्रित करणारी कादंबरी आहे.

'माऊली' ही मांजरावरील कादंबरी असून यामध्ये मांजराचा जीवनक्रम चित्रित केला आहे. सनातन मातृरुप प्रकट केलेली मांजरी लेखकाला माऊलीच्या रूपात दिसते.

'झोंबी' या कादंबरीमध्ये बालपणापासून ते मॅट्रिकपर्यंतच्या जीवनप्रवासाचे वास्तवदर्शी वर्णन यादवांनी केले आहे.

'नांगरणी व घरभिंती' या कादंबरीमध्ये एम.ए. पर्यंतच्या शिक्षणाचा व पुण्यातील नोकरीचा कालखंड यादवांनी चित्रित केला आहे.

तसेच 'काचवेल' व 'कलेचे कातडे' या त्यांच्या कादंबऱ्याही अलीकडेच प्रकाशित झाल्या आहेत. थोडक्यात यादवांच्या कादंबरी लेखनामुळे ग्रामीण साहित्य समृद्ध झाले आहे. त्यांचे हे योगदान ग्रामीण साहित्यास फार मोलाचे ठरले आहे. कादंबरी लेखनानंतर यादवांनी 'ललित गद्य' या वाङ्मयप्रकाराचे लेखन केले.

**१.३.४ ललितगद्य :**

मराठी ललित साहित्यातील 'ललित गद्य' हा एक साहित्यप्रकार आहे. आनंद यादव यांचे 'पाणभवरे', 'स्पर्श कमळे', 'साहित्यिकाचा गाव' हे तीन ललितगद्य संग्रह प्रकाशित झाले आहेत. आपल्या जीवनात आलेले अनुभव मुक्त आविष्कारात मांडण्यासाठी यादवांनी

ललितगद्य हा साहित्यप्रकार निवडला. ललितगद्याबाबत ते असे म्हणतात, ''पण जीवनात असे काही अनुभव असतात की त्यांना वास्तवाचे हे परिमाण असणे लेखकाला जरूर वाटते आणि तरीही त्याचा आविष्कार वाङ्मयीन पातळीवरच व्हावा असे वाटत असते. त्यातूनच या साहित्यप्रकारांचे अनुभवांकडून जे मागणे आणि त्या मागण्यांच्या मोबदल्यात घडलेल्या अनुभवात कल्पनेच्या पातळीवर जाऊन जे बदल करावे लागतात आणि हे जेव्हा लेखकाला नको असते, तेव्हा त्याच्या समोर एक शृंगापत्ती निर्माण होते. या शृंगापत्तीतून वाट काढण्यासाठी म्हणून मी 'ललितगद्या'कडे वळलो.''[५]

'पाणभवरे' हा ललितगद्य भूतकाळातील आठवणीवर यादवांनी लिहिला आहे. तर 'स्पर्शकमळे' मध्ये आत्मनिष्ठ पातळीवरील शृंगारिक स्वरूप व्यक्त झालेले आहे. 'साहित्यिकाचा गाव' मध्ये समाजातून मिळालेले वास्तव अनुभव यादव चित्रित करतात. यानंतर त्यांनी वगनाट्याचे लेखन केले.

**१.३.५ वगनाट्य :**

स्वातंत्र्योत्तर काळात काही लेखकांनी मनोरंजन व कलानिर्मितीसाठी वगनाट्याचे लेखन केले. याच काळात आनंद यादवांनी 'रात घुंगुरांची' (१९७७) हे वगनाट्य लिहिले. त्यात स्त्री कलावंत व तमाशा या कलेकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन यांचे चित्रण आले आहे. कविता, कथा, कादंबरी, ललितगद्य व वगनाट्य हे वाङ्मयप्रकार हाताळल्यानंतर त्यांनी या सर्व वाङ्मयप्रकारावर समीक्षात्मक असे लेखन केले.

**१.३.६ समीक्षा :**

यादवांनी साहित्य व समाजजीवन यांच्यात असलेल्या संबंधाचा शोध घेण्यासाठी समीक्षालेखन केले असून ते उपयोजित स्वरूपाचे आहे. आतापर्यंत यादवांचे चार समीक्षात्मक ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत.

'ग्रामीण साहित्य स्वरूप व समस्या' : यामध्ये ग्रामीण साहित्याच्या स्वरूपाचा वेध, ग्रामीण साहित्यांच्या प्रेरणा, ग्रामीण साहित्याच्या भाषेचे महत्त्व आणि मर्यादा यादवांनी सांगितल्या आहेत.

'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव' या समीक्षा ग्रंथामध्ये साहित्यातील ग्रामीणतेचा शोध, ग्रामीण साहित्य व सामाजिक वास्तव यांच्यातील संबंध यादवांनी चित्रित केला आहे.

'साहित्याची निर्मिती प्रक्रिया' या ग्रंथामध्ये साहित्य निर्मिती आणि साहित्य प्रकार, नव्या साहित्य प्रकाराच्या शोधात आशय अनुभव आणि अभिव्यक्ती इत्यादी लेख आहेत. तसेच 'मराठी साहित्य, समाज आणि संस्कृती' हा यादवांचा चौथा समीक्षाग्रंथ प्रकाशित झाला आहे. ग्रामीण साहित्यावर केलेले समीक्षालेखन हे त्यांच्या दीर्घ चिंतनातून निर्माण झाले आहे. समीक्षानंतर यादवांनी चरित्रात्मक कादंबरी या वाङ्मयप्रकाराचे लेखन केले.

**१.३.७ चरित्रात्मक कादंबरी :**

आनंद यादवांनी कविता, कथा, कादंबरी, ललितगद्य इत्यादी साहित्यप्रकार हाताळल्यानंतर ते चरित्रात्मक कादंबरी या साहित्यप्रकाराकडे वळले. 'लोकसखा ज्ञानेश्वर' ही यादवांची 'संत चरित्रात्मक कादंबरी' नोव्हेंबर २००५ मध्ये प्रकाशित झाली असून ती 'संत ज्ञानदेवांच्या' जीवनचरित्राचा वेध घेणारी आहे. तसेच अलीकडेच त्यांची 'संतसूर्य तुकाराम' ही संत चरित्रात्मक कादंबरी प्रकाशित झाली असून ती संत तुकारामाच्या जीवनचरित्रावर आधारित आहे.

**१.४ आनंद यादव यांच्या साहित्यास मिळालेले पुरस्कार :**

आनंद यादव यांच्या ग्रामीण साहित्यास अनेक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. यापैकी 'हिरवे जग' (काव्यसंग्रह) यास मुंबई सरकारचा पुरस्कार, गोतावळा, नटरंग (कादंबरी), मातीखालची माती, खळाळ (कथासंग्रह) यास महाराष्ट्र राज्य पुरस्कार, 'झोंबी' (आत्मचरित्रात्मक कादंबरी) यास साहित्य अकादमी पुरस्कार, दिल्ली. इत्यादी पुरस्कार यादवांच्या साहित्यास मिळाले आहेत. यावरून त्यांचे साहित्य किती दर्जेदार आहे याची आपणास कल्पना येते.

**१.५ समारोप :**

स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागात शिक्षणाचा फारसा विकास झालेला नसतानाही प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत यादवांनी आपले शिक्षण पूर्ण केले. घरातील मंडळीचा

शिक्षणास विरोध असतानाही त्यांनी आपले ध्येय पूर्ण केले व त्यासाठी अनेकांची मदत घेतली. प्रस्तुत प्रकरणात आनंद यादव यांचा परिचय करून घेतला आहे. त्यामध्ये त्यांचा जन्म, बालपण, शिक्षण, कौटुंबिक जीवन याचबरोबर त्यांच्यावरील विविध साहित्यिकांचा प्रभाव याविषयीचा अभ्यास केलेला आहे. तसेच त्यांची एकूण वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची जडणघडण आणि त्यांचे लेखन याचा स्थूल आढावा घेतलेला आहे.

कथा, कविता, कादंबरी, ललितगद्य, वगनाट्य व चरित्रात्मक कादंबरी इत्यादी वाङ्मयप्रकारात महत्त्वाची कामगिरी त्यांनी केली आहे. त्यांचे हे वाङ्मयीन योगदान ग्रामीण साहित्याच्या विकासास फार मोलाचे ठरले आहे.

सामान्य शेतकऱ्याच्या घरात जन्माला आलेल्या आनंद यादवांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेताना मन गोंधळून जाते. त्यांच्या कार्याचा व साहित्याचा वेध शब्दांच्या माध्यमातून घेणे खूपच अवघड काम आहे. म्हणूनच ज्ञानेश्वरांच्या एका ओवीत म्हटल्याप्रमाणे, ''सोन्याला सोन्यानं सजविता येत नाही. अत्तराला अत्तरानं सुगंधित करता येत नाही, पाण्यानं पाण्याला धुता येत नाही. फुलानं फुलांची पूजा करता येत नाही.'' त्याचप्रमाणे आनंद यादवांच व्यक्तिमत्त्व शब्दात मांडता येत नाही.

स्वातंत्र्योत्तर काळात 'चरित्रात्मक कादंबरी' हा वाङ्मयप्रकार उदयास आला. या वाङ्मयप्रकाराचा स्थूल आढावा पुढील प्रकरणात घ्यावयाचा आहे.

## संदर्भ


१. ठाकूर, रवींद्र, 'आनंद यादव : व्यक्ती आणि वाङ्मय', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, आवृत्ती पहिली, १९९३, पृ. क्र. ५

२. यादव, आनंद, 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. आवृत्ती पहिली १९७९, पृ. क्र. १८१

३. ठाकूर, रवींद्र, उ. नि. पृ. क्र. ५, ६

४. पुंडे, द. दि., (उखडलेली झाडे-आनंद यादव) मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती पहिली, १९८६, मलपृष्ठ.

५. यादव, आनंद, उ. नि. पृष्ठ क्र. १८१